स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत इतिहास विषयात पीएच. डी. पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा

ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाज- एकअभ्यास
(इ. स. १९५० ते २०१३)

संशोधक

किशोर हिराकांत आगिवले

बी.एन.एन. महाविद्यालय,भिवंडी

तालुका- भिवंडी, जिल्हा- ठाणे

मार्गदर्शक

प्रा.डॉ. संजय भाऊराव गिरे

(एम. ए, बी.एड, एम.फिल, पीएच. डी)

इतिहास विभागप्रमुख

पदवी व पदव्युत्तर विभाग

वसंतराव नाईक महाविद्यालय , नांदेड

संशोधनकेंद्र

श्री शिवाजी महाविद्यालय, कंधार

ता. कंधार, जी. नांदेड

ऑगस्ट २०२३

ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाज- एक अभ्यास

प्रस्तवाना-

भारतीय समाज हा विविधतेने संपन्न आहे. भारत हा बहुधर्मीय ,बहुभाषिक, बहु सांस्कृतिक समाज आहे. समाज हा विविध जाती जमाती या मध्ये विभागाला आहे. या प्रत्येक जाती , समूहाची वैशिट्यपूर्ण अशी सामाजिक सांस्कृतिक , धार्मिक परंपरा , चालीरीती परंपरा या जाती समूहांना इतरांपेक्षा वेगळी ओळख देतात. भारत देशातील महाराष्ट्रा चे स्थान हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांना जोडणारा दुवा म्हणजे महाराष्ट्र होय. महाराष्ट्राच्या संस्कृतीवर या दोन्ही भागातील संस्कृतीचा प्रभाव पडला आहे. आणि या मुळेमहाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक विविधतेमध्ये अनोखी अशी भर पडली आहे.महाराष्ट्राची सामजिक रचना हि अतिशय वैविध्यपूर्ण आहे. या समाज रचनेमध्ये जातीव्यवस्था आपले महत्व आजही राखून आहे. जातीव्यवस्था आजही महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये एक निर्णायक घटक सिद्ध होत आहे. हे समाज व्यवस्थेवरील जाती संस्थेचे प्राबल्य दर्शवते . या जातीपैकी कुणबी जाती समूह हा महाराष्ट्रातील प्रभावी मुख्य जाती पैकी एक महत्वाचा असा जाती समाज आहे. महाराष्ट्राच्या बाहेर गुजरात, कर्नाटक गोवा , मध्य प्रदेश या राज्यांमध्येही कुणबी समाज अस्तित्वात आहे. महाराष्ट्रा चा विचार करता कोकण आणि विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणवर कुणबी समाज मोठ्या प्रमाणावर वास्तव्य करून आहे.

कुणबी जाती मध्ये लेवा कुणबी, लेवा पाटील, लेवा पाटीदार , कुणबी मराठा, मराठा कुणबी या पोटजाती आहेत. कुणबी समाजाचा समावेश इतर मागास प्रवर्गामध्ये केला जातो. भारतीय मानववंश शास्त्र विभाग च्या नुसार कुणबी शब्दाची उतपत्ती कून आणि बी या दोन शब्दांच्या जोडणी मधून झाली आहे. ज्याचा शब्दश अर्थ शेती करणारा समूह असा होतो. तर प्रचलित मराठी मान्यतेनुसार कुणबी शब्दाची उत्पत्ती कुणबावा या शब्दातून झाली आहे. काही मान्यतेनुसार या शब्दाची उतप्ती कुर या संस्कृत शब्दापासून झाली आहे. कुर या शब्दाचा अर्थ मशागत करणारा असा होतो.थोडक्यात सर्व सिद्धांत कुणबी शब्दाचा अर्थ " शेती करणारा समूह " अशा अर्थाने घेतात. कुणबी जाती अथवा समाज हा शेतीव्यवसायावर आधारित समाज आहे. या समूहाचा मुख्य व्यवसाय हा शेती आणि शेती पूरक व्यवसाय आहेत.

सरकारी नोंदीनुसार ३००० पेक्षा अधिक जाती व हजारो उपजाती आहेत. या जातीची विभ्गणी सरकारने विविध सामाजिक प्रवर्गामध्ये केली आहे. सद्यस्थितीला ३७४३ जाती , उपजातींचा समावेश

इतर मागास प्रवर्ग या गटामध्ये करण्यात येतो. महाराष्ट्रातील कुणबी जातीचा समावेशही इतर मागास वर्ग या गटामध्ये केला गेला आहे.

आजच्या आधुनिक युगामध्ये समाजामध्ये वेगाने बदल होत आहेत. नव्याने निर्माण होणाऱ्या भौतिक सुविधा आज प्रचंड वेगाने ग्रामीण जीवनाचाही चेहरामोहरा वेगाने बदलून टाकत आहेत. त्याचबरोबर आजच्या आधुनिकीकरणाच्या काळात वेगाने स्थलांतर होत आहे. या मुळे विविध भागातील समाजरचना हि बदलत आहे. या सर्व घटकामुळे स्थानिक समूहावर प्रभाव पडत आहे. त्यांच्या चालीरीती, संस्कृती, या मध्ये बदल होत आहेत. ठाणे जिल्हा हा वेगाने विकसित झाला. याजिल्ह्यामध्ये वेगाने औद्योगीकरण झाले. नागरीकरणाची प्रक्रियाही अत्यंत वेगाने होत आहे. ठाणे जिल्ह्यातील या बदलांचा परिणाम येथील स्थानिक कुणबी समाजावर झाला आहे.या समाजाची सामाजिक संरचना , संस्कृती, आर्थिक स्थिती यात काळ ओघामध्ये बरेच बदल झाले आहेत. हे बदल अभ्यासून ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाची सद्यस्थिती जाणून घेणे गरजेचे आहे. म्हणून हा अभ्यास विषय संशोधनासाठी निवडण्यात आला आहे.

अभ्यास विषयाची निवड:

या पूर्वी भारतातील विविध जाती समूहांवरअभ्यास केला गेला आहे. ह्यासंशोधनामागील उद्देश हा प्रामुख्याने भारतातील जाती व्यवस्था समजावून घेणे, तिची उतपत्ती आणि विकास या मागील कारण मीमांसा जाणून घेणे हा होता. त्याचबरोबरकाही जाती समूहांच्या समस्या समजावून घेवून त्या संदर्भातउपाययोजना सुचवणे या अनुषंगाने हा अभ्यास केला गेला आहे. आजच्याझपाट्याने बदलणाऱ्या युगामध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक स्थित्यंतरे वेगाने होत आहेत. त्यामुळे विविध जाती समूहापुढील समस्या वेगाने बदलत आहेत . ठाणे जिल्ह्यामध्ये कुणबी समाजची लोकसंख्या जास्त आहे. अनेक तालुक्यामध्ये कुणबी समाजाची लोकसंख्या इतर जाती समूहांपेक्षा जास्त आहे. विशेषतःठाणे जिल्ह्यातील मुरबाड, शहापूर, अंबरनाथ, भिवंडी, वाडा या तालुक्यांमध्ये कुणबी समाजाची लोकसंख्या अधिक असल्याने या तालुक्यांच्या विशेष अनुशंगाने प्रस्तुत विषयाचा अभ्यास केला जाईल.ठाणे जिल्हा हा विकसित जिल्हा मानला जातो. मात्र आजही ग्रामीण भाग सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्यामागसलेला आहे. ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाच्या परंपरा, चालीरीती, संस्कृती, धार्मिक मान्यता, वैशिष्टये यावर जर संशोधनात्मक अभ्यास केला गेला तर भावी पिढीला ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाच्या जीवनमानाची नव्याने ओळख होईल.तसेच या समाजासाठी विविध योजना आखताना वा धोरणे राबविताना या संशोधनाचा उपयोग होईल.म्हणून ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाज- एक अभ्यास हा अभ्यास विषय संशोधनासाठी निवडण्यात आला आहे.

संशोधनाची उद्धीष्टे :

१) ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे
२) ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाची सामाजिक वसांकृतिकपरिस्थिती अभ्यासणे
३) ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
४) ठाणे जिल्ह्याच्या विकासामध्ये कुणबी समाजाचे योगदान अभ्यासणे.
५) ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक समस्या समजावून घेणे व त्याबाबत उपाय योजना सुचवणे.

गृहीतके

१) ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजची वेगळी अशी वैशिष्ट्यपूर्ण अशी संस्कृती आहे.
२) ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाची सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती हि इतर जिल्ह्यांच्या तुलनेने भिन्न आहे.
३) ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाज सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास आहे.
४) ठाणे जिल्ह्याच्या विकासामध्ये कुणबी समाजाने मोठे योगदान दिले आहे.
५) ठाणे जिल्यातील कुणबी समाजामध्ये अनुकूल सामाजिक व सांस्कृतिक बदल होत आहेत.

तथ्य संकलन–

तथ्यसंकलाना साठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचा वापर केला जाईल.

१) प्राथमिक साधने-
ऐतिहासिक कागदपत्रे, सरकारी कागदपत्रे , प्रत्यक्ष भेट, निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली इत्यादी साधनंचा वापर केला जाईल.

२) द्वितीय साधने –
वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भग्रंथ, वार्षिक अंक, व इतर संदर्भ साधनांचा वापर केला जाईल.

संशोधनाचा कालावधी-

ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाचा चिकित्सक अभ्यास या विषयावरील प्रस्तुत संशोधन कार्यपूर्ण होण्यासाठी तीन वर्षाचा कालावधी अपेक्षित आहे.

संशोधन पद्धती -

या अभ्यासासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला जाणार असून, अभ्यास विषयाचे विवेचन हे प्रामुख्याने प्राथमिक व दुय्यम साधनां द्वारे केले जाणार आहे. या विषयासंदर्भात माहिती गोळा करण्यासाठी प्राथमिक स्त्रोतांमध्ये मुलाखत व प्रश्नावली तंत्र आणि प्रत्यक्ष निरीक्षण यांचा आधार घेण्यात येणारआहे. ठाणे जिल्ह्यातील विविध गावामंधील जेष्ठ जाणकारतसेच समाजातील कर्तबगार व्यक्तींच्या मुलाखती घेण्यात येतील . तसेच कुणबी समाजाविषयी अधिक माहिती मिळवण्यासाठी प्रश्नावली तयार करून माहितीमिळवण्यात येईल.प्रश्नावली तयार करताना त्याद्वारे कुणबी समाजाची सामाजिक , आर्थिक, सांस्कृतिक माहित मुद्देसूद पद्धतीने मिळेल अशा पद्धतीने प्रश्न रचना केली जाईल.ठाणे जिल्ह्यातील कुणबीसमाज बहुसंख्येने राहणाऱ्या विविध गावांमध्ये प्रत्यक्ष जावून तेथील अनेक सण उत्सव सामाजिक धार्मिक कार्यक्रम सांस्कृतिक मोह्त्सव यामध्ये प्रत्यक्ष निरीक्षणं द्वारे माहिती संपादित करण्यात येईल.

दुय्यम स्त्रोतांमध्ये प्रामुख्याने विविध लेखकांनी याविषयासंबंधित लिहिलेल्या ग्रंथ आणि लेखांचा वापर माहिती मिळवण्यासाठी करण्यात येईल. तसेच दुय्यमसाधनामध्येसरकारी कागदपत्रेआणि वेब साईट यांचा वापर माहिती मिळवण्यासाठी करण्यात येईल.. विविध साप्ताहिके, वर्तमानपत्रे, मासिकेयांचाही वापर माहिती संकलित करण्यासाठी केला जाईल.

संशोधनाचा कालखंड –

या संशोधनामध्ये प्रामुख्याने ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाच्या सामाजिक सांस्कृतिक आणि आर्थिक इतिहास यावर संशोधन केले जाणार असून त्यामुळे प्रामुख्याने कुणबी समाजाच्या चालीरीती , परंपरा,संस्कृती,धार्मिक मान्यता, आर्थिक परिस्थिती या वर भर दिला जाणार आहे. कालानरूप समाजात होत गेलेली स्थित्यंतरे नीटपणे अभ्यासण्यासाठी स्वातंत्र्योत्तर कालखंडप्रामुख्याने विचारात घेण्यात आला आहे.विशेषतः महाराष्ट्र राज्य निर्मिती नंतरच्या विशेष संदर्भाने अभ्यास करण्यात येईल. संशोधनासाठी इ. स. १९५० ते इ. स. २०१३ हा कालखंड निवडण्यात आला आहे.

संशोधनाची व्याप्ती:

संबंधित संशोधनामध्ये प्रामुख्याने ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाचा अभ्यास केला जाणार असून या मध्ये कुणबी समाजाच्या सामजिक , आर्थिक आणि सांस्कृतिक स्थितीचा अभ्यास करून यासमाजाची सामजिक आर्थिक व सांस्कृतिक वैशिट्य भिन्नता तसेच त्यामध्ये होणारे आधुनिक बदल व त्याचा कुणबी समाजाच्या जीवन पद्धतीवर पडणारा प्रभाव याचा आढावा घेण्यात येणार आहे.

संशोधनाच्या मर्यादा:

संबंधित संशोधन हे फक्त ठाणे जिल्ह्यापुरते मर्यादित आहे. या संशोधनामध्ये ठाणे जिल्ह्यातील फक्त कुणबी समाज या समाज घटकावर संशोधन केले जाणार आहे. या संशोधांमध्ये फक्त ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाची सामाजिक , सांकृतिक आणि आर्थिक स्थिती या घटकांचा विचार करण्यात आलेला आहे.या संशोधनासाठी प्रामुख्यानेस्वातंत्र्योत्तर कालावधीचा विचार करण्यात आला आहे.तसेच कुणबी समाजाची लोकसंख्या मुरबाड , शहापूर, अंबरनाथ, भिवंडी, वाडा या तालुक्यामध्ये अधिक प्रमाणात असल्याने या तालुक्यांच्या विशेष अनुशंघाने प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्याचे ठरवले आहे. हे संशोधन प्रामुख्याने प्राथमिक तथ्य संकलनावर आधारित आहे.

प्रकरणांची रूपरेषा:

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्रकरणांची करण्यात आलेली मांडणी किवां रूपरेषा खालील प्रमाणे आहे.

१) पार्श्वभूमी-

या प्रकरणामध्ये ठाणेजिल्ह्याची ऐतिहासिक आणि भौगोलिक परिस्थितीयाचा आढावा घेण्यात येईल. ठाणे जिल्ह्याला प्राचीन असा इतिहासिक वारसा लाभला आहे. ठाणे जिल्ह्याचा प्रारंभापासून ते आधुनिक कालखंड पर्यंतचा इतिहास या प्रकरणामध्ये मांडण्यात येईल. मानवीजीवनावर सभोवतालची भौगोलिक परिस्थिती प्रभाव टाकते. या भौगोलिक परिस्थितीला अनुरूप मानव आपल्या जीवनात बदल घडवतो. त्यामुळे ठाणे जिल्ह्याची भागोलिक परिस्थिती जाणून घेणे गरजेचे आहे. या प्रकरणामध्ये ठाणे जिल्हाच्या भौगोलिक परिस्थिती बद्दल माहिती दिली जाईल.कुणबी समाज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये

पसरला आहे. या प्रकरणामध्ये कुणबी समाजाविषयी माहिती देण्यात येईल.विशेषतः ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाबद्दल माहिती दिली जाईल.

प्रस्तुतसंशोधनासाठीउपयोगातआणलेल्या संदर्भ साहित्याचा आढावा या प्रकरणामध्ये घेण्यात येईल.या प्रकरणामध्ये संशोधन विषयाशी संबंधित विविध लेखकांचे ग्रंथ आणि लेख यांचा चिकित्सक आढावा घेण्यात येईल.

२) ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाची सामाजिक स्थिती –

या प्रकरणामध्ये ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाच्या सामाजिक स्थितीचा आढावा घेण्यात येईल.यासमाजाची सामाजिक परिस्थिती वैशिष्ट्यपूर्ण स्वरुपाची आहे.कालानरूपठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाची जडण घडण कशी होत गेली, या परिस्थितीमध्ये काय स्थित्यंतरेझाली. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये काय बदल झाले. अन समाजाची सद्य सामाजिक परिस्थिती याचा उहापोह या प्रकरणामध्ये घेण्यात येईल.

३) ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाची सांस्कृतिक आणि धार्मिक स्थिती-

प्रत्येक समाजा च्या काही विशिष्ट चाली रिती परंपरा असतात , या चालीरीती परंपरा त्या समाजच वेगळेपण दर्शवत असतात. ठाणे जिल्यातील कुणबी समाजाच्याही काही वैशिष्ट्यपूर्ण अशा चालीरीती, परंपरा आहेत.याप्रकरणामध्ये ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाच्या चालीरीती परंपरा, धार्मिक संस्कार, पद्धती यांचा आढावा घेण्यात येईल. कुणबी समजाच्या सांस्कृतिक परंपरा समजून घेण्यात येतील त्याच बरोबर कालानरूप या चालीरीती परंपरा यामध्ये कोणते बदल झाले आहेत याचा अभ्यास करण्यात येईल. कालानरूपठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाच्या धार्मिक समजुतीमध्ये हि बदल झाले आहेत. हे बदल समजावून घेण्याचा प्रयत्न या संशोधनामध्ये केला जाईल.

४) ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाची आर्थिक स्थिती-

या प्रकरणामध्ये ठाणे जिल्हातील कुणबी समाजची आर्थिक स्थिती ची पडताळणी करण्यात येईल. कुणबी समाजाची गणती इतर मागास वर्ग या प्रवर्गामध्ये करण्यात येते.हा समाज प्रामुख्याने शेतीवर आधारित समाज आहे. शेतीमुख्यत: पावसावर आधारित आहे. शेती फारशी विकसित हि नाही .या अर्थाने हा समाज आर्थिक दृष्ट्या फारसा सुदृढ नाही. मात्रठाणे जिल्ह्यामध्ये ज्या वेगाने औद्योगीकरण झाले, जिल्ह्याचा ज्या वेगाने आर्थिक विकास झाला आहे, त्या विकासाचा कितपत

फायदा या समाजाला पोहचला याचा आढावा या प्रकरणामध्ये घेण्यात येईल. त्याचबरोबर स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये केंद्र आणि राज्य सरकारद्वारे शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबवल्या गेल्या. त्या योजनांचा किती फायदा येथील कुणबी समाजाने घेतला. त्यांच्या अर्थी परिस्थितीत काही सकारात्मक बदल झाले का , याचाही आढावा या प्रकरणामध्ये घेण्यात येईल.

५) ठाणे जिल्ह्याच्या विकासामध्ये कुणबी समाजातील व्यक्तींचे योगदान –

ठाणे जिल्ह्याचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला आहे. जिल्ह्याचे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले आहे. याविकासामध्ये कुणबी समाजातील व्यक्तींनी खूप मोठे योगदान दिले आहे. त्या पैकी काही व्यक्तींचे योगदान अभ्यासण्याचा प्रयत्न या प्रकरणामध्ये केला जाईल.

६) निष्कर्षआणि शिफारशी-

शेवटचे प्रकरण हे निष्कर्षआणि शिफारशी असणार आहे.याप्रकरणामध्येवरील सर्व प्रकरणांचाअभ्यास करून निष्कर्ष काढण्यात येतील व प्रस्तुत समस्यांबाबतशिफारशी सुचवल्या जातील.

टीप- संशोधनातील प्रगतीनुसार संशोधन आराखड्यामध्ये थोडाबहुत बदल होऊ शकतो.

संदर्भ सूची :

कालेकर गोनिंद मंगेश, मुंबई इलाख्यातील जाती, वरदा प्रकाशन पुणे ,१९२८

कालेकर गोनिंद मंगेश, लौकिक दंतकथा, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

कार्लेकर श्रीकांत , प्र. सांगळे शैलजा ‘महाराष्ट्राचा भूगोल, डायमंड पब्लिकेशन पुणे २०१२

के सागर, असा हा महाराष्ट्र, के सागर पब्लिकेशन्स पुणे २०१४

केतकर श्रीधर व्यंकटेश, ‘ प्राचीन महाराष्ट्र ‘ वरदा प्रकाशन, पुणे १९८९

चापेकर न गो’, बदलापूर’ आर्य संस्कृती प्रेस पुणे १९९७

ढवळीकर मधुकर केशव, ‘ महाराष्ट्राची कुळकथा’, राजहंस प्रकाशनपुणे २०१३

दाउद दळवी, ‘ असे घडले ठाणे’, श्रीकृपा प्रकाशन एरोली २०१०

देशमुख मा. म. , मराठा कुणबी समाजाची दशा आणि दिशा , शिवभारती प्रकाशन, १९९२

भावे ह अ, ‘ शिकार ते शेती’, वरदा बुक्स प्रकाशन पुणे १९९७

राजवाडे वी का, ' भारतीय विवाह संस्थेचा विकास',लोक वाड्मय गृह मुंबई २०१४

शेणोलीकर ह श्री , देशपांडे प्र न , महाराष्ट्राचा सामाजिक , सांस्कृतिक इतिहास के सागर पब्लिकेशन्स पुणे २००९

Deshpande, R,. Kunbi Maratha as OBC: Backward journey of a caste. Economic and Political Weekly,2004

Ghurye, G. S,. Caste and race in India. Popular Prakashan., 1969

Jodhka, S. S. Caste in contemporary India. Routledge India., 2017

Kumar R. Western India in the nineteenth century: a study in the social history of Maharashtra. Routledge,2013

Thane district Gazetteer.

District collectorate, Thane. An official website of Thane District:Govt. of Maharashtra. http://www.thane.nic.

संशोधक

किशोर हिराकांत आगिवले

बी. एन. एन. महाविद्यालय,भिवंडी

तालुका- भिवंडी, जिल्हा- ठाणे

मार्गदर्शक

डॉ. संजय भाऊराव गिरे

(एम. ए, बी.एड, एम.फिल, पीएच. डी)

इतिहास विभागप्रमुख

पदवी व पदव्युत्तर विभाग

वसंतराव नाईक महाविद्यालय , नांदेड